# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ७२-२३** **दिनांक :- ०३/०३/२०२३**

अवजड वाहने (ट्रक/टेम्पो) चोरी करणा-या आंतरराज्यीय टोळीतील आरोपीतांना अटक करुन ४ करोड ७५ लाख रु. किंमतीची ५३ वाहने जप्त.

## गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा यांची कामगिरी.

----oooooo----

दिनांक २३/१२/२०२२ रोजी ०९.०० ते दिनांक २५/१२/२०२२ रोजी ०७.०० वाजेच्या दरम्यान फिर्यादी विनयकुमार हिरालाल पाल, वय ४७ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. डी /७०४, रोझ गार्डन सिध्दी विनायक नगर, काशिमीरा, मिरारोड पूर्व यांनी त्यांचे मालकीचा एक आयशर कंपनीचा १११० मॉडेलचा टेम्पो क्रमांक एम.एच.०४.जेके.८३०८ जु.वा. हा ते राहत असलेल्या सोसाटीचे समोर रोडवर मोकळया जागेत पार्क करुन ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करुन नेलेबाबत काशिमीरा पोलीस ठाणेत गु.र.नं. ९०२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा मार्फत गुन्हयाचा समांतर तपास सुरु होता. त्यानुसार घटनास्थळावरील सी.सी.टि.व्ही फुटेजचे अवलोकन करुन मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपी नामे १) फारुख तैय्यब खान, वय ३६ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. फखरुद्दीनका, पो. टपुग्रा, ता. टिजारा, जि. अलवार, राजस्थान २) मुबिन हारिस खान, वय ४० वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. फखरुद्दीनका, पो. टपुग्रा, ता. टिजारा, जि. अलवार, राजस्थान यांची नावे निष्पन्न झाल्याने नमूद आरोपीतांना राजस्थान पोलीसांचे मदतीने दिनांक ०८/०१/२०२३ रोजी अटक करण्यात आली.

गुन्हे तपासात अटक आरोपीतांनी गुजरात, राजस्थान व हरीयणा राज्यांतील १२ सह आरोपीतांसह महाराष्ट्र, हरीयणा, उत्तरप्रदेश, दिल्ली इत्यादी राज्यांतुन टेम्पो/ट्रक चोरी करुन त्यावरील मुळ इंजिन व चेसिस नंबर बदलुन त्यावर बनावट तयार केलेल्या कागदपत्रां प्रमाणे असलेले इंजिन व चेसिस नंबर टाकून विविध आर.टी.ओ. विभागात रिअसाईन (नोंदणी) केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे गुजरात, राजस्थान व हरीयणा येथील पोलीस व आर.टी.ओ. चे मदतीने एकुण ४,५०,००,०००/- रुपये किंमतीची एकूण ५३ वाहने त्यात ४८ आयशर टेम्पो, ०२ टाटा टेम्पो, ०१ अशोक लेलॅण्ड टेम्पो व ०२ क्रेटा कार अशी वाहने जप्त करुन महाराष्ट्र, हरियाना, उत्तरप्रदेश, दिल्ली राज्यांतील २२ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत व इतर जप्त ट्रकची आयशर कंपनीचे तज्ञ यांना बोलावून त्याचेकडून मुळ मालक यांचा शोध घेणे चालू आहे.

## :- उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर | कायदयाचे कलम |
|---|---|---|---|
| १. | काशिमीरा | ९०२/२०२२ | भा.दं.विं.सं. ३७९, ४६५, ४६८, ४७१, १२० (ब) |
| २. | मनोर पोलीस ठाणे, पालघर | ३०८/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| ३. | अंबड पोलीस ठाणे, जि. नाशिक | ९०३/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| ४. | गोहाना सिटी सोनीपत पोलीस ठाणे, हरियाना | १९१/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| ५. | कर्नाल सिटी पोलीस ठाणे, हरियाना | १०८८/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| ६. | सानोली पोलीस ठाणे, राज्य हरियाना | २४५/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| ७. | ई क्राईम ब्रँच, दिल्ली | ३२७००/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| ८. | दुजना जज्जर पोलीस ठाणे, हरियाना | १९/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| ९. | पलवल सिटी पोलीस ठाण, हरियाना | ६९५/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| १०. | द्वारका पोलीस ठाणे, दिल्ली | १७०४५/२१ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| ११. | फेज-१ गौतमबुध्द नगर पोलीस ठाणे उत्तरप्रदेश | ६१७/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| १२. | सराफाबाद पोलीस ठाणे, हरियाना | ४३३/२०२१ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| १३. | विसरवाडी पोलीस ठाणे, जि. नंदुरबार | १९२/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| १४. | गडमुक्तेश्वर हापुड पोलीस ठाणे, उत्तरप्रदेश | ३३६/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| १५. | ई पोलीस ठाणे करोलबाग, दिल्ली | २३६७/२०२१ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| १६. | सहलवास जज्जर पोलीस ठाणे, हरियाना | ४४/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| १७. | खेरकी डौला पोलीस ठाणे, गुडगाव, हरियाना | २२३/२०२१ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| १८. | ई पोलीस ठाणे ओखला, दिल्ली | ३५२१२/२०१७ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| १९. | मुजेसर पोलीस ठाणे, हरियाना | ४६४/२०२१ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| २०. | ई. पोलीस ठाणे ,तिलकमार्ग दिल्ली | २२७३५/२०२२ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| २१. | ई पोलीस ठाणे, क्राईम ब्रँच, दिल्ली | १४४६७/२०१८ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |
| २२. | गोविंदपुरी पोलीस ठाणे, दिल्ली | /२०१८ | भा.दं.विं.सं. कलम ३७९ |

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीराचे पो.नि. श्री. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, सुहास कांबळे, स.फौ. राजु तांबे, संदीप

शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, संतोष चव्हाण, पो.हवा. अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, सचिन सावंत, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, समीर यादव, पो.अंम. प्रशांत विसपुते, सनी सुर्यवंशी तसेच १) चौपानकी पो.ठाणे, राजस्थान, २) एस.ओ.जी., राजस्थान ३) पेथापुर, पो.ठाणे गांधीनगर, ४) गुन्हे शाखा अहमदाबाद, राज्य गुजरात यांनी केली आहे.




-----oooo-----